# कैद्यांचं धर्मांतर प्रकरण, आ.पडळकरांच्या तक्रारीनंतर जेलर पेट्रस गायकवाडांची उच्चस्तरीय चौकशी होणार




### धर्म परिवर्तनासाठी दबाव

बीड जिल्हा कारागृहात कारागृह अधीक्षक पेट्रस जोसेफ गायकवाड यांच्याकडून तीन हिंदू आणि एक मुस्लिम कैद्यावर धर्म परिवर्तन करण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचा आरोप कैद्यांच्या वकिलांनी केल्यानंतर कारागृह अधीक्षक वैभव आगे यांनी याची दखल घेत पेट्रस गायकवाड यांच्या चौकशीसाठी पथकाची नियुक्ती केली आहे. पेट्रस गायकवाड यांनी मात्र या प्रकरणी बोलण्यास नकार दिला. या प्रकरणी कुठलीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

### चार अधिकाऱ्यांच्या पथकाने केली तपासणी

बीड जिल्हा कारागृहातील कैद्यांचे धर्म परिवर्तन करण्यासाठी दबाव आणला जात असल्याच्या आरोपानंतर राज्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी छत्रपती संभाजी नगर येथून कारागृह निरीक्षक जगताप यांच्यासह चार अधिकाऱ्यांच्या पथकाने शुक्रवारी सकाळी बीडमध्ये दाखल होत जिल्हा कारागृहाची तपासणी केली. आरोपांच्या अनुषंगाने ही तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये ज्या बाबी पथकाच्या निर्दशनास आल्या आहेत त्याचा अहवाल वरिष्ठांना सादर केला जाणार असल्याचे सुत्रांनी सांगितले.

### जिल्हा कारागृहाचा कारभार कायम वादात

बीड जिल्हा कारागृहाचा कारभार हा गेल्या काही महिन्यापासून कायम वादाचा विषय ठरला आहे. खंडणी आणि हत्या प्रकरणात अटकेत असलेल्या वाल्मिक कराडला व्हीआयपी ट्रिटमेंट दिली, यावरुनही जिल्हा कारागृह चर्चेत आले. खोक्याला सुविधा दिल्याचा आरोपही करण्यात आला. जिल्हा कारागृहातील कैद्यांकडे गांजा सापडला. कैद्यांच्या दोनगटात मारामाऱ्या झाल्या. यासर्व प्रकारांमुळे बीड जिल्हा कारागृहाता कारभार हा कायम वादात सापडत आहे. विशेष करून पेट्रस गायकवाड यांच्यावर गंभीर स्वरुपाचे आरोप गेल्या काही दिवसांपासून होत आहेत.

बीड । दिव्य न्युज

येथील जिल्हा कारागृहातील कैद्यांचे धर्मांतर केले जात असल्याचा आरोप आ. गोपीचंद पडळकर यांनी केला होता. पडळकरांनी या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेत सरकारने कारागृह अधीक्षक पेट्रस गायकवाड यांच्या चौकशीसाठी पथकाची नियुक्ती केली असून हे पथक प्रत्यक्ष बीडच्या जेलला भेट देऊन चौकशी करणार आहे, अशी माहिती कारागृह महानिरीक्षक वैभव आगे यांनी दिली आहे.

बीडच्या जिल्हा कारागृहामध्ये कैद्यांना धर्मांतर करण्यासाठी जेलर पेट्रस गायकवाड यांच्याकडून दबाव तंत्राचा वापर केला जात असल्याचा आरोप केला जात आहे. कैद्यांचे वकील राहुल आघाव यांनी पत्रकार परिषद घेऊन पेट्रस गायकवाड करत असलेल्या धर्म परिवर्तनाच्या प्रकाराची चौकशी करण्याची मागणी केली. धर्म परिवर्तन करण्यासाठी तयार न होत असलेल्या कैद्यांना धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप ॲड. आघाव यांनी केला आहे. ॲड. आघाव यांनी म्हटले आहे की, जिल्हा कारागृह वर्ग २या ठिकाणी धर्म परिवर्तन करण्यासाठी जे कायद्याला मान्य नाही, जे संविधानाला मान्य नाही या ठिकाणचं सर्वात मोठं रॅकेट जिल्हा कारागृहात वर्ग २ या ठिकाणी केलं आहे. या कैद्यांना आमिष दाखविले जाते की आम्ही तुम्हाला पैसे देऊ, आमच्या धर्मामध्ये तुम्ही धर्म परिवर्तन करा, आ. पडळकर म्हणाले की, बीडच्या कारागृहातील कारागृह अधीक्षक पेट्रस जोसेफ गायकवाड हे कारागृहात धर्मांतराचं काम करतात. आतमध्ये भिंतीवर बायबलमधील स्लोगन लिहिलेले आहेत. जेलमध्ये होणारे भजन, कीर्तन पेट्रस गायकवाड यांनी बंद केलं आहे. कैद्यांना धर्मांतर करण्यासाठी पैशाचे आमिष दाखविले जात आहे.

## जिंतूर तहसीलदारांच्या कार्यपद्धतीवर सामाजिक कार्यकर्त्यांचा संजय आडे यांचे आरोप-जिल्हाअधिकाऱ्या कडे निवेदनाद्वारे केली कारवाईची मागणी

जिंतूर । दिव्य न्युज : सालेह चाऊस

जिंतूर येथील स्थानिक सामाजिक कार्यकर्ते संजय रामराव आडे यांनी तहसीलदार, जिंतूर यांच्या कार्यपद्धतीबाबत गंभीर आरोप करत लेखी निवेदन सादर केले आहे. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, परभणी आणि उपविभागीय अधिकारी, सेलू यांनाही देण्यात आली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाचे कामकाज स्वतःकडे ठेवून तहसीलदार लोकांच्या शिधापत्रिकेतील नावे समाविष्ट करणे, वगळणे तसेच नवीन शिधापत्रिका मंजुरी यासंबंधी खाजगी व्यक्तींच्या सांगण्यावरून कामे करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कारणामुळे सर्वसामान्यांना वेळेवर सेवा मिळत नसल्याचेही म्हटले आहे. याशिवाय, शेतकऱ्यांच्या फार्मर आयडी संबंधी कामातही दिरंगाई होत असल्याचे, कारण तहसीलदारांनी स्वतःच्या मोबाईल लिंकवर लॉगिन करून काम केल्यामुळे शेतकऱ्यांना शासन योजनांचा लाभ मिळण्यात अडथळे येत असल्याचे संजयआडे यांनी निदर्शनास आणले आहे. तसेच, १८ वर्षे पूर्ण झालेल्या परंतु आधारकार्ड नसलेल्या नागरिकांच्या प्रकरणांनाही मंजुरी न दिल्याचे आणि कार्यालयातील काही कर्मचार्यांना अवाजवी सवलत देऊन त्यांच्याकडून घरूनच प्रकरणे निकाली काढली जात असल्याचे गंभीर आरोपही करण्यात आले आहेत.




संजयआडे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, तहसीलदारांनी कार्यालयीन जबाबदाऱ्या संबंधित नायब तहसीलदार आणि मंडळ अधिकाऱ्यांना सुपूर्द करावयात, जेणेकरून शेतकरी व नागरिकांची कामे सुरळीत पार पडतील. अन्यथा, या प्रकरणात वरिष्ठ अधिकार्यांकडे औपचारिक तक्रार दाखल केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. सदर निवेदनामुळे जिंतूर तहसील कार्यालयात एकप्रकारचे चर्वितचर्वण सुरू असून, या आरोपांवर प्रशासनाकडून काय प्रतिसाद येतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जितुर नगरपरिषद मधील जन्म-मृत्यु नोंद विभागाचा कारभार पारदर्शक करावा या मागणी साठी न.प.समोर धरणे आंदोलन



जिंतूर । दिव्य न्युज : सालेह चाऊस

नगरपरिषदेच्या जन्म/ मृत्य विभागातील अनागोदी कामकाजा मुळे शहरवासी त्रस्त झाल्या मुळे जिंतूर येथील सामाजिक कार्यकर्ते सय्यद फेरोज स. मोईन यांनी यापूर्वी दिनांक २५ सप्टेंबर रोजी न.प. चया मुख्यअधिकारी यांना निवेदन देऊन विनंती केली होती की, जिंतुर नगरपरीषद च्या जन्म / मृत्यु विभागातील कर्मचारी हे कामचुकार पणा करीत असुन नागरीकांना उडवा उडवी ची उत्तरे देतात साईड बंद आहे, नेट चलत नाही, साहेबाची सही झाली नाही असे सांगत असतात व त्यांना नावे सुद्धा समाजाचे नाव सुद्धा व्यवस्थित लिहता येत नाही म्हणून त्यावर आपण योग्यती कार्यवाही करावी परंतू आज पावेतो माझ्या तक्रार अर्जावर निर्णय घेण्यात आला नाही. त्या करीता मी आज दिनांक १०/१०/२०२५ पासुन आपल्या कार्यालयाजवळ धरणे आंदोलन साठी बसले आहे . शहरातील व ग्रामीण भागातील पालंकाना वेळेवर जन्म/मृत्यु नोंद असलेले दाखले देण्यासाठी कामा मध्ये पारदर्शकता आणावी आणि वेळेच्या आत नोंदी घेऊन जन्म/ मृत्यु दाखले देण्यात यावे नसता माझे पुढील आंदोलन लोकशाही मार्गाने चालूच राहील असे सय्यद फेरोज स नईम यांनी सांगितले.

## समाजात न्याय प्रस्थापित करण्याचे काम अण्णा भाऊंचे साहित्य करते-प्रा.जी.मनोजा

बीड । दिव्य न्युज

येथील हॉटेल ग्रँड यशोदा मध्ये एक दिवशीय अंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन पुणे विद्यापीठाचे सेवानिवृत्त प्राध्यापक बजरंग कोरडे यांनी केले तर बीजभाषक म्हणून तेलंगणा येथील पलामरू विद्यापीठाच्या प्राध्यापक जी. मनोजा उपस्थित होत्या. यावेळी त्या म्हणाल्या की, अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य स्वाभिमानाची शिकवण देते, त्यांचे साहित्य वाचकाला न्यायाची भूमिका स्वीकारण्यास प्रवृत्त करते तसेच चुकीला विरोध करण्याची जागरुकता निर्माण होते. समाजात खऱ्या अर्थाने जर न्याय प्रस्थापित करायचा असेल तर अण्णा भाऊंच्या साहित्याचे सामूहिक वाचन झाले पाहिजे. कारण अण्णाभाऊंचे साहित्य माणसाला रडायला नाही तर लढायला शिकवते. अण्णा भाऊंच्या साहित्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असणारा समाज निर्माण करण्याचे काम अण्णा भाऊंच्या साहित्याने केले असे त्यांनी यावेळी प्रतिपादन केले. पुणे विद्यापीठाचे सेवानिवृत्त इंग्रजीचे प्राध्यापक डॉ. बजरंग कोरडे यांनी या परिषदेचे औपचारिक उद्घाटन करून अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनातील अनुभव, सामाजिक संघर्ष आणि लेखनातून निर्माण झालेल्या संवेदनशीलतेवर भाष्य केले तर प्रास्ताविक करताना परिषदेचे संयोजक प्रा. रमेश लांडगे यांनी अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य - सामाजिक बदलाचा आराखडा या संकल्पनेवर प्रकाश टाकला. यावेळी ते म्हणाले की, अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे सामाजिक अन्याय, वंचितांसाठी आवाज आणि परिवर्तनाची नांदी ठरले आहे. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षक नेते उत्तम पवार तर उद्घाटन सत्राचे अध्यक्ष म्हणून कालिकादेवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे उपस्थित होते. यावेळी बोलताना कंधारे म्हणाले की, अण्णा भाऊंच्या लेखनामुळे वाचकाला समानतेचा बोध येतो आणि समाजात जबाबदारीची जाणीव जागृत होते. त्यामुळे अण्णा भाऊंचे साहित्य हे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अभ्यासणे खूप गरजेचे आहे. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते अण्णा भाऊ साठे: जीवन व कार्य या संदर्भ ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन डॉ. पांडुरंग सुतार यांनी केले तर आभार परिषदेच्या आयोजक डॉ. अनुप्रिता मोरे यांनी मानले. या परिषदेत संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## तुझा कॅरेक्टर खराब करेल!

### पोलिस कर्मचाऱ्याची धमकीचा व्हिडिओ व्हायरल होताच जिल्हाभरात संतापाची लाट

नेकनूर । दिव्य न्युज : सय्यद अर्शद

नेकनूर परिसरात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यु.पी.एस.सी.ची मेन्स परीक्षेची तयारी करणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलाला थेट पोलीस कर्मचाऱ्याकडून तुझा कॅरेक्टर खराब करेल अशी धमकी देण्यात आल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, जिल्हाभरात संतापाची लाट पसरली आहे. सदर युवक हा एका सर्वसामान्य शेतकऱ्याचा मुलगा असून, तो प्रामाणिक मेहनतीच्या जोरावर प्रशासनात जाण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी झटत आहे. मात्र, एका पोलिस कर्मचाऱ्याने त्याला थेट कॅरेक्टर खराब करण्याची धमकी देऊन त्याच्या आत्मविश्वासावरच घाव घालण्याचा प्रयत्न केला आहे.

मिळालेल्या अधिक माहितीप्रमाणे नेकनूर परिसरातील शेतकऱ्याच्या शेतात पवनचक्की बसविण्यात आली, मात्र त्याचा मोबदला शेतकऱ्याला मिळालेला नाही. मोबदला न देता पवन चक्की चा काम सुरू ठेवण्याच्या प्रयत्नात पवनचक्की मालकाने थेट पोलिसांचा आधार घेतला. धक्कादायक म्हणजे, पोलिस कर्मचारी स्वतः शेतकऱ्यांनाच धमकावत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला असून, या प्रकरणाने जिल्हाभरात खळबळ उडवली आहे. पवनचक्की मालकाच्या कामासाठी पोलिसांनी थेट शेतकऱ्यांवर दबाव आणल्याचा आणि मोबदला न देता त्यांना गप्प बसवण्याचा प्रयत्न करत धमकी दिल्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला आहे.

कायद्याचा रक्षकच जर सर्वसामान्यांच्या कॅरेक्टरवर डाग आणण्याची भाषा करणार असेल, तर नागरिकांनी विश्वास कुणावर ठेवायचा? प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या शेतकरी पुत्राचा 'कॅरेक्टर' पोलिसांच्या हातात आहे का? या घटनेनी पोलिस यंत्रणेच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उभे केले असून, नागरिक व सामाजिक संघटनांकडून संबंधित पोलीस कर्मचाऱ्यावर तातडीने निलंबन आणि चौकशीची मागणी केली जात आहे.

दरम्यान, या व्हायरल व्हिडिओनंतर सोशल मीडियावर संतापाचा जणू स्फोट झाला आहे. पोलिसांच्या गणवेशात लपलेला अहंकार प्रशासनाची प्रतिमा मलिन करतोय अशा प्रतिक्रिया उमटत असून, या घटनेने जिल्हा प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



## हाफेज मन्सुर तय्यीबी यांनी वार्ड क्रमांक २२ मधुन निवडणुक लढववी युवकांची मागणी



बीड । दिव्य न्युज

बीड शहरातील व्राड क्रमाक २२ मधील रहिवाशी हाफेज मन्सुर तय्यबी यांनी निवणूक लढववी युवाकांची मागणी नवीन वार्ड हाफेज मन्सुर तय्यीबी गेल्या अनेक वर्षापासून ते सामाजिक कार्यायमध्ये अग्रे सर आहे त्यांनी वार्ड क्रमाक २२ मेध्य जनसामान्याचे प्रश्न समजुन कार्य केले आहे वार्ड क्रमांक २२ हा मूल भूत सुविधा पासून वंचित आहे नगरीकांचे प्रश्न समजुन कार्य केले आहे सध्याचे प्रशासन व लोक प्रतिनिधि अपयशी ठरले आहे सामाजिक कार्यत अग्रसर असलेल्या हाफिज मंसूर तय्यबी यानी निवडणूक लड़वावी व जनते चे प्रश्न सोड वावेत अशी मागणी येथील युवक नागरिकानी केली आहे.

## वार्ड क्रमांक ३ मध्ये शेख नदीम हाफेज नसीम यांची जोरदार चर्चा!

धारूर । दिव्य न्युज

धारूर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या वार्ड क्रमांक ३ मध्ये शेख नदीम हाफेज नसीम यांचे नाव प्रचंड चर्चेत आले आहे. सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय असलेल्या नदीम यांनी अनेक वर्षांपासून लोकांच्या अडचणी सोडवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. स्थानिक परिसरातील तरुणवर्ग, व्यापारी तसेच महिलांमध्ये त्यांचा चांगला संपर्क आणि विश्वास निर्माण झाला आहे.



नदीम यांच्या कामामुळे परिसरात स्वच्छता, रस्ते दुरुस्ती, आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये लक्षणीय बदल दिसून येत आहेत. जनतेची सेवा हेच आमचे ध्येय या घोषवाक्याने ते प्रचार करत असून, नागरिकांमध्ये सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. राजकीय पातळीवरही त्यांच्या नावाची चर्चा वेगाने वाढत असून, येणाऱ्या निवडणुकीत त्यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. वार्ड क्रमांक ३ मध्ये तरुण आणि अनुभवी नेतृत्वाचा संगम म्हणून शेख नदीम हाफेज नसीम हे नाव आता अग्रस्थानी चर्चेत आहे.

## ससेवाडी-मोरगाव मार्गावरील पन्नास वर्षांपूर्वीचा रस्ता खुला महसूल प्रशासनाची प्रभावी कारवाई-शेतकऱ्यांमध्ये आनंदाची लाट

### तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची धडाडी आणि शेतकऱ्यांविषयी असलेला कनवाळूपणा पुन्हा झाला सिद्ध

बीड । दिव्य न्युज

बीड तालुक्यातील ससेवाडी - मोरगाव परिसरात मागील पन्नास ते साठ वर्षांपासून बंद असलेला जुना रस्ता अखेर खुला झाला . दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली महसूल , पोलीस व ग्रामपातळीवरील प्रशासनाच्या संयुक्त कारवाईतून हा ऐतिहासिक निर्णय प्रत्यक्षात उतरला

ही कारवाई महाराष्ट्र राज्याचे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शेतकरी हिताचे निर्णयानुसार विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर आणि बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली . महसूल विभागाच्या शेतकरीहिताच्या धोरणात्मक कार्यपद्धतीचा हा ठोस परिणाम असल्याचे मानले जात आहे .गेल्या पाच - सहा वर्षांपासून हा रस्ता काही व्यक्तींनी अडवून ठेवला होता . त्यामुळे ससेवाडीच्या सुमारे १५० शेतकऱ्यांना शेतीकामासाठी तसेच नागरिकांना दळणवळणासाठी मोठा त्रास सहन करावा लागत होता . अखेर महसूल प्रशासनाने कायदेशीर चौकटीत राहून धाडसी कारवाई केली आणि रस्ता पुन्हा खुला करून ग्रामस्थांना दिलासा दिला . या कार्यवाहीदरम्यान मंडळ अधिकारी सोनाली कदम , ग्राम महसूल अधिकारी रेश्मा तानगे , ससेवाडीचे सरपंच अरुण रसाळ , संदीप कदम , एम . खान तसेच अनेक स्थानिक शेतकरी उपस्थित होते . पोलीस प्रशासनाच्या वतीने सहाय्यक उपनिरीक्षक विठ्ठल राठोड , म . पो . रमा तुरुकमारे , पोलीस नाईक सुदाम शेलार यांनी शिस्तबद्ध सुरक्षेची जबाबदारी पार पाडली भूमापक ए . बी . चव्हाण , संजय जायभाये आणि ए . एन . बीडकर यांनी रस्त्याच्या सीमारेषा मोजून तांत्रिक अडथळे दूर करत कार्यवाहीची पूर्तता केली . उपस्थित प्रशासनिक पथकाने जेसीबीच्या साहाय्याने रस्त्यावरील अडथळे हटवून मार्ग पुन्हा वाहतुकीसाठी खुला केला . या वेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की , शेतकऱ्यांचा हक्क आणि सार्वजनिक मार्ग सुरक्षित ठेवणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे . शासनाच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या हितासाठी आम्ही तत्पर आहोत. महाराष्ट्र शासनाने अलीकडेच शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आहेत . खरीप हंगामासाठी ई - पीक पाहणीस मुदतवाढ देण्यात आली होती . या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना पीकविमा , अनुदान आणि शासकीय योजनांचा लाभ सोयीस्कररीत्या मिळणार आहे . नैसर्गिक आपत्ती नुकसानभरपाई प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी ऑनलाइन पंचनामे प्रणाली राबविण्यात येत आहे . तसेच ड्रोन सर्वेक्षण आणि आधुनिक भूमापन पद्धतीद्वारे नकाशा सुधारणा कार्य देखील सुरू आहे .तहसीलदार शेळके यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले की , प्रत्येक शेतकऱ्याने






►► पान २ वर

दिव्य वार्ता

## महाराष्ट्रातील शाळांमध्ये उर्दू भाषा

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांनी महाराष्ट्रातील शाळांमध्ये उर्दू भाषा पर्यायी विषय म्हणून शिकवण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक उर्दू शाळा असून, अनेक विद्यार्थी हिंदी किंवा संस्कृतऐवजी उर्दू शिकण्यास इच्छुक आहेत. मराठी आणि उर्दू यांचे ऐतिहासिक नाते लक्षात घेता, ही मागणी सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्त्वाची आहे. मलिक यांनी मुंबईत 'उर्दू भवन' उभारण्याची आणि त्याचे उद्घाटन माणिकराव कोटाटे यांच्या हस्ते करण्याची सूचनाही केली. ही मागणी त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या उर्दू कार्यक्रमात बोलताना मांडली.

# महाराष्ट्रातील शाळांमध्ये उर्दू भाषा शिकवा, राष्ट्रवादीच्या नेत्याची मागणी; 'सांस्कृतिक आणि ऐतिहासिक...'

**मुंबई । दिव्य न्युज**

**भारत देश हा विविध भाषांनी समृद्ध आहे. प्रत्येक भाषेचा गोडवा आणि त्याचे सांस्कृतिक महत्व वेगळे आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील शाळांमध्ये उर्दू भाषा शिकवण्याची मागणी करण्यात आलीय. कोणी आणि का ही मागणी केलीय?**

### जावेद अख्तर काय म्हणाले?

प्रसिद्ध लेखक आणि गीतकार जावेद अख्तर यांनी महाराष्ट्राने उर्दू भाषेला जिवंत ठेवल्याचे कौतुक केले. दिल्लीसह इतर राज्यांना उर्दू टिकवता आली नाही, पण महाराष्ट्राने ती समृद्ध केली. उर्दू भारतातून जगभर पसरली, विशेषतः इस्लामिक देशांमध्ये, आणि तिचा मान हा भारताचा मान आहे, असे ते म्हणाले.जावेद अख्तर यांनी मराठवाड्यातील पेशव्यांचा उल्लेख करत सांगितले की, पेशवे पर्शियन आणि मराठी बोलत. शिवाजी महाराजांच्या दरबारातही या दोन्ही भाषांचे सेवक होते. स्वातंत्र्यानंतर मुंबईने उर्दू लेखकांना रोजगार दिला, विशेषतः चित्रपटसृष्टीत ९०% संवाद आणि गीते उर्दूत लिहिली गेली. महाराष्ट्राने उर्दू भाषेच्या संवर्धनात मोलाची भूमिका बजावली आहे. मुंबईने उर्दू साहित्य आणि चित्रपटांना मंच दिला, ज्यामुळे ही भाषा जागतिक स्तरावर पोहोचली. मलिक यांची मागणी आणि पिळगावकर-अख्तर यांचे विचार उर्दूच्या सांस्कृतिक वारशाला नवसंजीवनी देणारे ठरतील.

### सचिन पिळगावकरांचे उर्दू प्रेम

मराठमोळे अभिनेते सचिन पिळगावकर यांनी 'बहार-ए-उर्दू' कार्यक्रमात उर्दू भाषेवरील आपले प्रेम व्यक्त केले. मराठी माझी मातृभाषा असली तरी मी उर्दूत विचार करतो, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या या विधानाने उर्दूच्या सौंदर्याबद्दलचा आदर अधोरेखित झालाय.



प्रश्न: महाराष्ट्रातील शाळांमध्ये उर्दू भाषा शिकवण्याची मागणी कोणी आणि का केली आहे?

उत्तर: राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांनी महाराष्ट्रातील शाळांमध्ये उर्दू पर्यायी विषय म्हणून शिकवण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक उर्दू शाळा असून, अनेक विद्यार्थी हिंदी किंवा संस्कृतऐवजी उर्दू शिकण्यास इच्छुक आहेत. मराठी आणि उर्दू यांचे ऐतिहासिक नाते लक्षात घेता, ही मागणी सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे. तसेच, मलिक यांनी मुंबईत 'उर्दू भवन' उभारून त्याचे उद्घाटन माणिकराव कोटाटे यांच्या हस्ते करण्याची सूचना केली.

प्रश्न: सचिन पिळगावकर आणि जावेद अख्तर यांनी उर्दू भाषेबाबत काय मत व्यक्त केले?

उत्तर: मराठमोळे अभिनेते सचिन पिळगावकर यांनी 'बहार-ए-उर्दू' कार्यक्रमात सांगितले की, मराठी त्यांची मातृभाषा असली तरी ते उर्दूत विचार करतात, ज्यामुळे उर्दूच्या सौंदर्याचा आदर दिसून येतो. जावेद अख्तर यांनी महाराष्ट्राने उर्दू भाषेला जिवंत ठेवल्याचे कौतुक केले. त्यांनी नमूद केले की, दिल्लीसह इतर राज्यांना उर्दू टिकवता आली नाही, पण महाराष्ट्राने ती समृद्ध केली आणि चित्रपटसृष्टीत ९०% संवाद-गीते उर्दूत लिहिली गेली.

प्रश्न: महाराष्ट्राने उर्दू भाषेच्या संवर्धनात कसे योगदान दिले आहे?

उत्तर: महाराष्ट्राने उर्दू भाषेला जागतिक स्तरावर पोहोचवण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. मराठवाड्यातील पेशवे पर्शियन आणि मराठी बोलत, तर शिवाजी महाराजांच्या दरबारात दोन्ही भाषांचे सेवक होते. स्वातंत्र्यानंतर मुंबईने उर्दू लेखकांना चित्रपटसृष्टीत रोजगार दिला, ज्यामुळे उर्दू साहित्य आणि संवाद जिवंत राहिले. महाराष्ट्राने उर्दूच्या सांस्कृतिक वारशाला नवसंजीवनी दिली आहे.

## मुप्टा बीड जिल्हा शिक्षक संघटनेची मराठवाडा पदवीधर नोंदणी अभियान महत्वपूर्ण बैठक, जिल्हा बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहा-प्रा.शशिकांत जावळे

बीड । दिव्य न्युज

बीड जिल्ह्यातील सर्व 'मुप्टा' पदाधिकारी कार्यकर्ते यांना कळविण्यात येते की 'मुप्टा' शिक्षक संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीमध्ये मराठवाडा पदवीधर नोंदणी अभियान राबविण्यासाठी मुप्टाच्या वतीने जास्तीत जास्त पदवीधर नोंदणी करण्यासाठी 'मुप्टा' संघटनेच्यावतीने बीड शहरातील नीलकमल हॉटेल येथे ११ ऑक्टोबर २०२५ शनिवारी सायंकाळी ६.००वाजता महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.



बीड जिल्ह्या 'मुप्टा' शिक्षक संघटनेच्या वतीने पदवीधर नोंदणी मोठ्या संख्येने करण्यात येणार आहे. तसेच 'मुप्टा' शिक्षक संघटनेचा क्रांतीबा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा व 'मुप्टा' संघटनात्मक बांधणी बाबत प्रामुख्याने चर्चा करण्यात येणार आहे.या बैठकिचे आयोजन बीड जिल्हाध्यक्ष शरदराव मगर यांनी केले आहे.वरील सर्व विषयावर मुप्टाचे संस्थापक सचिव प्रा.सुनीलजी मगरे सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. तरी बीड जिल्ह्यातील 'मुप्टा' पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन 'मुप्टा' बीड जिल्हा सचिव प्रा.शशिकांत जावळे,भैय्यासाहेब आदोडे,बाळासाहेब गव्हाणे,प्रा.नारायण घोलप, प्रवीण तरकसे, शैलेश चिलवंत, प्रा संजय बागुल, डॉ मनोहर सिरसाठ,प्राचार्य श्रीकांत वारभूवन, प्रमोद साळवे यांनी केले आहे.

## बनावट कागदपत्रे बनवून कंपनीला ३२ लाखांचा गंडा
### नगरमधील घटना : गुन्हात श्रीगोंद्यातील दोघांचा समावेश

गायत्री ढवळे । दिव्य न्युज

श्रीगोंदा :फायनान्स कंपन्यांकडून खातेदारांची फसवणूक केल्यांच्या अनेक घटना घडत आहेत. मात्र, बनावट कागदपत्रे तयार करून कर्ज घेऊन परतफेड न करता एका फायनान्स कंपनीला ३२ लांखाचा गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. हा प्रकार २०२२ ते मार्च २०२४ दरम्यान फायनान्स कंपनीच्या अहिल्यानगरच्या शाखेत घडला. याप्रकरणी सहा जणांविरोधात तोफखाना पोलिस ठाण्यात



फसवणुकीचा गुन्हा बुधवारी नोंदविण्यात आला आहे.सुलताना फकरोद्दीन सय्यद, रौकीब फरोद्दीन सय्यद (दोघे रा. जवखेडे खालासा, ता. पाथर्डी), अमोल पोपट शिंदे, जयश्री अमोल शिंदे (दोघे रा. माधवबाग, सोनई, ता. नेवासा), विकास सुनील भुजबळ, सायली रमेश जाधव (दोघे रा. येळेपणे, ता. श्रीगोंदा), असे गुन्हा दाखल झालेल्या इसमांची नावे आहेत. कंपनीचे व्यवस्थापक दिगंबर संदीपान फुले यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. ते फेड बँक फायनान्शियल सर्व्हिसेस या कंपनीच्या अहिल्यानगर शाखेत व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत.

आरोपींनी बनावट कागदपत्रे तयार करून कंपनीकडून कर्ज घेतले; परंतु त्यांनी कर्जाचे हप्ते न भरल्याने कर्ज प्रकरणाची चौकशी करण्यात आली. या चौकशीत कर्जदारांनी दिलेली कागदपत्रे बनावट असल्याचे समोर आले. कर्जदारांनी बनावट कागदपत्रे देऊन कर्ज मिळविले असून, या मध्ये कंपनीची फसवणूक झाली आहे, अशी व्यवस्थापक फुले यांची खात्री झाली. त्यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास तोफखाना पोलिस करीत आहेत.

## बीड नगर परिषदेच्या नगरअध्यक्षपदासाठी पुरुषोत्तम वीर यांच्या पत्नी आम्रपाली वीर यांना वंचित बहुजन आघाडी कडून उमेदवारी देण्याची मागणी



बीड । दिव्य न्युज

बीड नगर परिषदेच्या आगामी नगर अध्यक्षपदाच्या निवडणुकीत पुरुषोत्तम वीर यांना वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी बीडमधील जनतेकडून जोर धरू लागली आहे गेल्या तीस ते ३५ वर्षापासून जो बीडचा विकास व्हायला पाहिजे तसा विकास झालेला नाही अनेक ठिकाणी घाणिचे साम्राज्य स्वतंत्र ड्रेन्नेज नाही . पिण्याच्या फुटलेल्या पाईपलाईन मधे

### बीड ची जागा (एस.सी) राखीव असल्याने पुरुषोत्तम वीर यांच्या पत्नी उच्च शिक्षीत योग्य उमेदवार राहतील

नाल्याचे पाणी . रस्त्यावर बाजारपेठा .मोठ मोठे दालन उभावरून त्यात मुताऱ्या होऊ लागल्या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे १५ / १६ दिवसाला नळाला पाणी . शहरात सिटी बस नाही त्यामुळे शहराचे व्यवस्थापन थांबले अनेक भागात रस्ते नाहीत . शहरात असलेल्या बिंदूसरा नदीच्या मूख्यपूलाला आनेक वर्षापासून कठडे नाहीत .

असे अनेक समस्या शहरातील आहेत त्यामुळे बीड शहराच्या विकासाची ज्यांना जान आहे आणि सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी तळमळ आसलेल्या

▶▶ पान २ वर

## बीड जिल्ह्यात जातीय दंगली घडवायचे आहे का?-शेख युनूस

बीड । दिव्य न्युज

महाराष्ट्रात काही आमदार स्वतःला हिंदुत्ववादी समजत आहे. दादा त्यामध्ये आपल्या पक्षातील संग्राम जगताप हे नेहमी जातीय तेढ निर्माण करण्याचे काम करीत असून आपण त्यांना पाठराख करीत आहे की काय असे जनतेकडून बोलले जात आहे. आपला पक्ष हा सर्व धर्म निरपेक्ष आणि पोरोगामी विचारसरणी असणारा पक्ष आहे.मग आपल्या पक्षात हा



जातीवादी आणि सडक्या विचाराचा आमदार कसा?

छत्रपती शिवरायांनी कधी जातिवाद केलेला नाही त्यांच्या सैन्यात देखील मुस्लिम मावळे होते. त्यांचे अंगरक्षक हे सुद्धा मुस्लिम होते. हे संग्राम जगताप ला माहित नाही वाटतं. त्यांनी अगोदर इतिहास वाचावा. आणि हे लक्षात ठेवावे की भारत देश हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानावर चालणारा देश आहे. बीड जिल्ह्यातील लोक

▶▶ पान २ वर

## जिल्ह्यानंतर विभागातही सोहम लांगोरेची 'चमकदार' कामगिरी...
### राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी बीडमधून निवड

बीड । दिव्य न्युज: महाराष्ट्राच्या बुद्धिबळ नकाशावर बीडच्या एका युवा खेळाडूचे नाव आता ठळकपणे उमटले आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेत 'पहिला' क्रमांक पटकावल्यानंतर, बीडचा सुपुत्र चि.सोहम अतुल लांगोरे याने विभागीय स्तरावरही आपल्या बुद्धिमत्तेची आणि कौशल्याची 'चमकदार' मोहोर उमटवली आहे.

महाराष्ट्र युवक व क्रीडा संचालनालय व जिल्हा क्रीडा कार्यालय,बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेत दैदिप्यमान यश मिळवल्यानंतर, चंपावती विद्यालयातील इयत्ता ९ वीत शिकणाऱ्या सोहमने शुकवार दि. १० ऑक्टोबर रोजी हिंगोली येथे पार पडलेल्या छत्रपती संभाजीनगर विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत १७ वर्ष वयोगटात 'द्वितीय' क्रमांक पटकावून आपल्या तयारीची साक्ष दिली आहे.या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर,जालना, बीड, लातूर, परभणी, हिंगोली,नांदेड आणि धाराशीव या जिल्ह्यातील विजयी गुणवंत बुद्धिबळपटूचा समवेश होता.या महत्त्वपूर्ण कामगिरीमुळे सोहमने थेट राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेतील आपले स्थान दिमाखात निश्चित केले आहे. सोहम लांगोरे हा केवळ एक शालेय विद्यार्थी नाही, तर तो आंतरराष्ट्रीय

▶▶ पान २ वर






## अडीच वर्षानंतर वाळू खुली, ७० ऐवजी ३० हजार रुपयांत टिप्पर
### २८ ऑक्टोबरपर्यंत भरता येईल, ३६ वाळू घाटांसाठी टेंडर




"२८ ऑक्टोबरपर्यंत टेंडरची मुदत राहील ई-निविदा भरण्यासाठीची २८ ऑक्टोबर ही अंतिम तारीख आहे.जास्तीत जास्त टेंडर धारकांनी सहभाग घ्यावा, १० टक्के वाळू ही घरकुलासाठी राखीव असणार आहे. २८ ऑक्टोबरला निविदा ओपन केल्या जाणार आहेत.

-शिवकुमार स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी

### घाट सुरू होताच सामान्यांना दिलासा

वाळू घाट बंद असल्याने बीडमध्ये वाळू मिळत नाही. वाळूची चोरट्या मार्गावर विक्री होत असून सध्या ७० हजार रूपयाला १ टिपर मिळत आहे. वाळू घाट सुरू झाल्यानंतर हेच टिपर ३० हजाराला मिळेल.

बीड । दिव्य न्युज

बीड जिल्ह्यात मागील अडीच वर्षांपासून वाळूचे टेंडर नसल्याने आणि अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ४० टिप्परवर तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी कारवाई केल्याने वाळू बंद होती. दरम्यान, वाळू घाट सुरू करावा यासाठी बांधकाम कामगारांनी मोर्चाही काढला होता. बीडमध्ये मागील दीड वर्षापूर्वी टेंडर काढण्यात आले होते. मात्र, एकही निविदा न आल्याने टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली नाही. त्यानंतर पुन्हा १० वाळू घाटांसाठी टेंडर काढण्यात आले. मात्र, राज्याचे वाळू धोरण बदलल्याने टेंडर प्रक्रिया रद्द करण्यात आली. आता राज्यातील

▶▶ पान २ वर




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०